**प्रेस नोट दिनांक - १२/०८/२०१९**

---

**माथाडी कामगार संघटनेच्या नावावर हॉटेल व्यावसायिकास खंडणीसाठी धमकावणारे चौघे जेरबंद गुन्हे शाखा युनिट - ३ ची कारवाई**

---

कोथरुड भागातील एक हॉटेल व्यावसायिकास मागील एक ते दिड महिण्यापासुन माथाडी कामगार ट्रान्सपोर्ट आणि सुरक्षारक्षक संघटनेच्या नावाखाली ओम धर्मजिज्ञासू, योगेश कामगुडे, महेश परीट, योगेश कानगुडे हे चौघांनी मिळुन त्यांना तुमच्याकडे नेहमी माल येत असतो तो आमचे कामगारांकडुनच खाली करुन घ्यायचा नाहीतर दरमहा रुपये १८,०००/- रुपये हप्ता दयावा लागेल नाही तर हॉटेल चालु देणार नाही, तुम्ही हॉटेल कसे चालविता ते बघु , तुम्हाल खलास करु अशी वारंवार समक्ष व फोनवरुन हॉटेल मालक व त्यांचे व्यवस्थापक यांना धमक्या देवुन खंडणी मागत होते. त्यांचे दहशत व भितीमुळे हॉटेल मालक घाबरले होते. त्यांनी त्यांचे वडील व इतर नातेवाईकांशी चर्चा करुन घटनेबाबत पोलीसांना माहीती दिल्यानंतर सदरबाबत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

गुन्हे शाखा युनिट - ३ पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी हे गुन्हयातील संशयीत आरोपींचा शोध घेत असताना पोलीसांनी त्यांचेबाबत खब-याकडुन माहीती काढुन कोथरुड सुतारदरा शिवकल्याण नगर, पौड रोड जयभवानी नगर, वारजे माळवाडी या भागात सापळा लावुन दिनांक - १२/०८/२०१९ रोजी संशयीत इसमनामे १) ओम तिर्थराम धर्मजिज्ञासु वय-३० रा-रुम नंबर ४ शेख चाळ शास्त्री नगर कोथरुड पुणे २)ललीत मारुती काकडे वय-२८ रा - राजयोग सोसायटी गणपती मंदीरसमोर वारजे माळवाडी पुणे ३) महेश कालीदास परीट वय-१९ रा - शेलार कॉम्प्लेक्स जयभवानी नगर कोथरुड पुणे ४) योगेश प्रकाश कानगुडे वय-२४ रा - सुतारदार शिवकल्याण नगर कोथरुड पुणे यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. त्यांचेकडे प्राथमिक तपास केला असता त्यांचा गुन्हयामध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच ते स्वतः कोणत्याही प्रकारे हमाली करत नसल्याचे आढळुन आले आहे. त्या गुन्हयामध्ये अटक करण्यात आलेले आहे. त्यांचे ताब्यातुन एकुण चार मोबाईल फोन एकावन्न हजार रुपये किंमतीचे जप्त करण्यात आलेले आहे.

आरोपी ओम धर्मजिज्ञासु याचेविरुध्द कोथरुड पोलीस स्टेशन पुणे येथे सन २००९ मध्ये खुनाचा एक, सन २०१५ मध्ये दुखापतीचा एक व भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे येथे सन २०१७ मध्ये पिस्तोल जवळ बाळगल्याचा एक असे तीन गुन्हे दाखल आहेत. तो माथाडी कामगार संघटनेचा पुणे जिल्हा अध्यक्ष व ललीत काकडे हा उपाध्यक्ष म्हणुन काम करत असल्याचे त्यांनी पोलीसांना सांगीतले आहे.

अशाप्रकारे आरोपी यांनी पुणे शहरामध्ये वेगवेगळया ठिकाणचे व्यापारी, हॉटेल व मॉलचे मालक व चालक यांना माथाडी कामगार संघटनेच्या नावाखाली धमकावुन पैशाची मागणी केल्याबाबत माहीती प्राप्त झालेली आहे. त्यावरुन त्यांनी अशाप्रकारे माथाडी संघटनेच्या नावाखाली कोणाला धमकावुन त्यांचेकडुन पैसे घेतले आहेत काय ? त्याबाबत त्यांनी गुन्हे शाखा युनिट - ३ पुणे शहर मोनं - ९४२००१५७१८ या फोनवर संपर्क साधावा व पोलीसांना माहीत दयावी असे आवाहान पोलीसांनी केले आहे.

सदर कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. बच्चन सिंह, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट-३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, पोलीस उप निरीक्षक किरण अडागळे, संजय गायकवाड, राजकुमार केंन्द्रे व गुन्हे शाखा युनिट - ३ पथकातील पोलीस कर्मचारी सपोफौ अनिल शिंदे,किशोर शिंदे,रामदास गोणते, संदीप तळेकर, दत्तात्रय गरुड, संदिप राठोड, प्रविण तापकीर,संतोष क्षिरसागर,गजानन गानबोटे सचिन गायकवाड, यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा युनिट - ३ पुणे